**सर्व साधारण बदल्या सन २०२२**
**अत्यंत महत्वाचे / कालमर्यादीत**

१६८६
जाक्र.जिप/ साप्रवि/ आस्था-१ / /२०२२
कार्यालय,जिल्हापरिषद,वाशिम
दिनांक २०|०८|२०२२

**प्रति,**

१) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम
२) प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वाशिम
३) खाते प्रमुख----------------- - - - ----- - - - - - - ---(सर्व)जि.प.वाशिम
४) गट विकास अधिकारी पं.स.----------------- ----------------- ----(सर्व)
५) बाल विकास प्रकल्प अधिकारी ए.बा.वि.से.यो.-------------------- --(सर्व)
६) उप अभियंता जि.प.ल.सि./ग्रापापु/बांध.उपविभाग------------------ --(सर्व)
७) तालुका वैद्यकिय अधिकारी-------------------- ----------------- ---(सर्व)
८) वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.के.------------------ ------------------ -(सर्व)
९) मुख्याध्यापक जि.प.हायस्कुल-------------------- ----------------- --(सर्व)

**विषय:-जिल्हा परिषद गट क व गट ड च्या कर्मचाऱ्यांच्या बदल्याच्या धारेणाची अमलबजावणी बाबत.**

**संदर्भ:-१)शासन निर्णय क्र.जिपब- ४१४ / प्र.क्र.११२ / आस्था-१४ दिनांक १५ मे २०१४.**
**२)शासन निर्णय क्र.जिपब - ४१४/ प्र.क्र.११२ / आस्था-१४ दिनांक २ जुलै २०१४.**
**३)मा.अवर सचिव,महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. १३८/१६ दि. २२/४/२०१६**

उपरोक्त विषयान्वये शासनाच्या ग्राम विकास व जलसंधारण विभागाने जिल्हा परिषदेच्या कर्मचा-यांचे सर्वसाधारण बदल्याची कार्यवाही वेळेच्या वेळी होणेचे दुष्टीने जिल्हा परिषद कर्मचा-यांचे प्रत्येक संवर्गाची वास्तव्य सेवा जेष्ठता सुची तयार करण्याचे सुचना दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने खालील सुचनाचे अवलोकना करुन नेमनु दिलेल्या कालावधीत वास्तव्य सेवा जेष्टता यादी तयार होवून सादर होतील ते पहावे.

तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक २७/२/२०१७ चे सुधारीत निदेशानुसार दिनांक १५/५/२०१४ बदली संबंधीचे धोरण प्राथमिक शिक्षक, पदविधर प्राथमिक शिक्षक व मुख्याध्यापक यांना लागु असणार नाही.प्रस्तुत संवर्गाची शिक्षण विभागाने शासन निर्णय दिनांक २७/२/२०१७ च्या धोरणानुसार आपले स्तरावरुन कार्यवाही करावी.

१. जिल्हा परिषद कर्मचा-यांच्या प्रत्येक संवर्गातील वास्तव्य सेवा जेष्ठता यादी स्वतंत्रपणे तयार केली जाईल.
२. एका तालुक्यात ५ वर्ष सेवा झालेल्या कर्मचा-यांना आपसी बदली अनुज्ञय राहील.
३. वास्तव्य सेवा जेष्टता यादी हि बदली वर्षाच्या म्हणजे ३१ मे २०२२ पर्यत झालेली वास्तव्य सेवा गृहीत धरुन प्रसिध्द करण्यात येणार आहे.तसेच सदर वास्तव्य सेवा जेष्टता यादी जिल्हा परिषद,वाशिमच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावी.

४. वास्तव्या सेवा जेष्टता सुची तयार करताना पंचायत समिती क्षेत्रामध्ये सर्व पदावर एकुण सध्याच्या पदावरील सेवा तसेच सध्याचे पदावर पदोन्नती होण्यापुर्वी सध्या कार्यरत असलेल्या पंचायत समिती क्षेत्राात कार्यरत असल्यास पदोन्नती पुर्व सर्व पदावरील लगत पुर्वीची सेवा विचारात घेवुन ( वर्ग ४ पदावरील सेवा वगळता ) सदर यादीमध्ये कालावधीचा समावेश करावा.

५. वास्तव्य सेवा जेष्टता यादी तयार करताना जिल्हा परिषद व पंचायत समिती क्षेत्रातील सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणुन देण्या बाबत दक्षता घ्यावी.

६. शासन निर्णयातील तरतुदीनुसार ज्या कर्मचा-यांना प्रशासकिय बदलीमधुन सुट वा विनंती वरुण बदली करताना ज्या कर्मचा-यांना ५ वर्षाची अट शिथील करावयाची आहे किंवा प्राधान्य क्रमाचा लाभ घ्यावयाचा आहे त्यांनी त्या बाबतचा ठोस पुरावा सक्षम प्राधिकाराचे स्वाक्षरीने दिनांक ३० एप्रील २०२२ पर्यत सादर करणे बंधनकारक राहील.

७. दुर्धर आजार असलेल्या कर्मचा-यांनी जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करावे.

८. विधवा / परितक्त्या/ कुमारीका / सैनिक / अर्धसैनिक जवानाच्या विधवा यांनी कार्यालय प्रमुखांचे प्रमाणपत्र सादर करावे.

९. अपंग कर्मचारी यांनी जिल्हा शल्यचिकीत्सक यांनी ( त्रीसदस्य प्रमाणपत्र ) व पडताळणी केलेले प्रमाणपत्र सादर करावे.अपंग कर्मचारी यांनी ज्याप्राधिकारणाकडुन प्रमाणपत्र मिळाले आहे त्यांचे वरिष्ठ प्राधिकारणाकडुन प्रमणपत्र पडताळणी प्राप्त करुन घ्यावे.

१०. वास्तव्य सेवा जेष्टता सुची तयार करताना तसेच जिल्हास्तरावरील व पंचायत समिती स्तरावरील बदल्याचे वेळापत्रक संदर्भीय शासन निर्णय व शासन परिपत्रकाम नमुद केल्यानुसार काटेकोरपणे पालन केले जाईल याची नोद घ्यावी.

११. विनंतीवरुन बदलीसाठी इच्छुक कर्मचा-यांनी संदर्भीय शासन निर्णयातील परिशिष्ट -१ मधील विहीत नमुण्यात अर्ज दिनांक २५ एप्रिल २०२२ पर्यत सादर करणे बंधनकारक राहील.

**१२. तालुका स्तरावरील प्रशासकिय व विनंती बदल्या हया दिलेल्या कालावधीत न चुकता पुर्ण करण्या बाबत दक्षता घ्यावी.**

१३. कर्मचा-यांचे पाल्य मतीमंद असल्यास जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करावे.

१४. परिचर संवर्गातील कर्मचाऱ्यांसाठी सामान्यपणे पदावधी निश्‍चित केलेला नाही.तथापी ज्यांना विनंतीवरुन बदली करावयाची आहे. शासन कर्मचा-यानी शासन निर्णयातील परिशिष्ट -१ मधील विहीत नमुण्यात अर्ज दिनांक २५ एप्रिल २०२२ पर्यत सादर करणे बंधनकारक राहील.

१५. बदल्याचे संबधाने अनेकदा तक्रारी उदभवतात क्वचित प्रसंगी न्यायालयीन प्रकरणाना देखील सामोरे जावे लागते या बाबी विचारात घेवुनच सदरची कार्यवाही वस्तुस्थितीदर्शक बिनचुक आणि कालबध्द स्वरुपात होईल याची दक्षता घ्यावी.

Vasumar

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद वाशिम**